करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...

परखड अग्रलेख | वस्तुनिष्ठ बातम्या
विविध सदरे | करमाळेकरांची खास ओळख

साप्ताहिक कमलाभवानी
# संदेश

वर्षे 31 वे

| www.saptahiksandesh.com | kamalabhavanisandesh@gmail.com |

संस्थापक संपादक : डॉ.अॅड.बाबूराव हिरडे
संपादक : सौ.उषादेवी बाबूराव हिरडे,
वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर
मो.९४२३३३७४८०

आपल्या व्यवसायाची ऑनलाईन जाहिरात करण्यासाठी उपयुक्त ठिकाण
साप्ताहिक संदेश ऑनलाईन न्यूज पोर्टल
संपर्क 9822058106

रजि नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३३ वे | अंक क्र.१०२ | पाने-१२ | दि.११/११/२०२२ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत ३ रू.

॥ श्री कोटलिंग प्रसन्न ॥
मजबुती आणि विश्वास एकाच ठिकाणी..!
शिवम
स्टिल अॅन्ड सिमेंट एजन्सी
टी.एम.टी.बार चे अधिकृत विक्रेते
प्रोप्रा : अमोल बबन ढवळे
(9850125561, 9423339966)
खडी, क्रशसॅण्ड योग्य दरात मिळेल
पत्ता : नगर-सोलापूर बायपास रोड, करमाळा.
आयकॉन स्टीलचे अधिकृत विक्रेते

# जीन मैदानातील व्यापारी संकुल समस्येच्या गर्तेत

## प्रशासनाने तात्काळ दखल घेण्याची गरज


करमाळा : शहरातील तरूणांना व्यवसाय सुरू करण्यासाठी, नागरीकांना खरेदीसाठी व्यापार पेठ निर्माण करण्यासाठी व नगरपालिकेला उत्पन्नाचे साधन निर्माण करण्यासाठी येथील जीन मैदानावर सुरू केलेले माजी आमदार नामदेवरावजी जगताप व्यापारी संकुल हे समस्येच्या गर्तेत असून, पालिका प्रशासनाने याची तात्काळ दखल घेऊन सुधारणा करण्याची गरज आहे.


शासनाकडून नगरपालिकेसाठी जीन मैदानाच्या जागेवर आरक्षण टाकले. त्यानंतर त्याचा वाद उच्च न्यायालया पर्यंत गेले. न्यायालयीन वाद मिटल्यावर या जीन मैदानाची मालकी पालिकेकडे आली आणि त्यानंतर पालिकेने माजी आमदार कै.नामदेवरावजी




जगताप व्यापारी संकुलाची उभारणी २००५ ते २०१४ या कालावधीत टप्प्या टप्प्याने केली आहे. या संकुलामध्ये ए, बी-१, बी-२, बी-३, सी, डी असे विविध ब्लॉक बांधण्याची संकल्पना मांडली होती. त्यापैकी डी ब्लॉक फक्त कागदावरच राहिला. इतर ब्लॉक मध्ये मिळनू शंभर ते सव्वाशे गाळे बांधण्यात आले. याचबरोबर विविद ब्लॉक मध्ये स्वच्छतागृहे बांधली. गटारी बांधल्या, बोअर घेतला, पाण्याच्या टाक्या बसविल्या. पिण्याच्या पाण्याचा नळ बसविण्यात आला. वीज कनेक्शन उपलब्ध करून दिले. स्ट्रीट लॅम्प बसविले. पार्किंगसाठी जागा केली. कंपाउंड बांधले, प्रवेशद्वार बांधले आदी सर्व सुविधा दिल्या. (पान नं.५ वर...)

॥ श्री स्वामी समर्थ ॥
जेऊर येथील ग्राहकांच्या उत्तम प्रतिसादानंतर आता आम्ही करमाळेकरांच्या सेवेत दाखल

BAKE & CAKE
बेकरी



शुध्द शाकाहारी
आमच्याकडे स्वच्छ व रोजच्या रोज ताजे बनविलेले बेकरी पदार्थ मिळतील.
- खारी
  बॉम्बे खारी, समोसा खारी
  चिज खारी, पिळा खारी
- टोस्ट
  फ्रूट टोस्ट, मावा टोस्ट, गहू टोस्ट,
  तीळ टोस्ट, चॉकलेट टोस्ट
- जिरा बटर, चीज बटर
- मखनिया बटर
- कप केक, लावा केक
- मावा केक
- बनपाव, मस्कापाव
- पेस्ट्री, ब्रेड
- लादी पाव, क्रिम रोल
- पिझ्झा बेस, नानकेट
- स्विसबेरी बिस्कीट
- काजू बिस्कीट
- पिस्ता बिस्कीट
- ऑरेंज बिस्कीट
- चॉकलेट बिस्कीट

आईसकेक 270/- पासुन पुढे
साधेकेक 150/- पासुन पुढे
फक्त २० मिनीटात ऑर्डरप्रमाणे आईसकेक बनवून मिळतील.
(१९ फ्लेवर्समध्ये उपलब्ध)
प्रोप्रा : शिंदे ब्रदर्स, मो.9890033901, 9421007282
पत्ता : राशिनपेठ, चिवटे मिठाई शेजारी, करमाळा., जि.सोलापूर

सोयीचा गैरफायदा घेतला की सर्वांचीच गैरसोय होते.

## संपादकीय.......................................!

# ढाबा..!

'ढाबा' म्हटलं की रस्त्याच्या कडेला पसरट पत्र्याचे शेड, समोर टाकलेल्या बाजा, बाजुला पाण्याचा हौद आणि ट्रका उभा करण्यासाठी असलेले मोकळे पटांगण असे दृश्य समोर उभे राहते. ढाबा हा शब्द अपभ्रंशातून निर्माण झालेला आहे. जेवणाचा डबा यातील 'डबा' हा शब्द प्रचलित झाला आणि ड चा ढ होऊन डब्याऐवजी 'ढाबा' हे नाव रूढ झाले आहे.

खरंतर आपल्याकडे हॉटेल संस्कृती ही अलिकडील काही वर्षात प्रचलित झाली आहे. ज्या प्रवाशांना जेवणाची कुठेच सोय नाही, अशांसाठी हॉटेल हे निर्माण झाले. अलिकडे गावातीलच लोक हॉटेलमध्ये गर्दी करताना दिसून येतात. मध्यमवर्गीय विशेषतः नोकरीला असलेले लोक आठवड्यातून एक किंवा दोन दिवस हॉटेलमध्ये कायम जेवण करत असतात. हॉटेल हे मध्यम वर्गीय तसेच उच्चवर्गीयांसाठी आहे. हॉटेलमध्ये टू स्टार, थ्री स्टार, फाईव्ह स्टार असे प्रकार आहेत. ग्रामीण भागात गाव विशेषतः शहर आणि शहराजवळ हॉटेलाची गर्दी दिसते. करमाळा शहरात शहरामध्ये बायपास आणि इतर रस्त्यावर हॉटेलांची रेलचेल दिसून येते.

'हॉटेल' आणि 'ढाबा' यामध्ये बराच फरक आहे. ढाब्यावर वाहनचालक किंवा सर्वसामान्य प्रवासी थांबतात याशिवाय ग्रामीण भागातील काही लोक विशेष पार्टी करण्यासाठी धाब्याचा वापर करतात. ढाब्यावर जेवण थोडे स्वस्त मिळते. ढाब्यावर तंदुरी रोटीचे चुलवान असते. अपवादात्मक ठिकाणी चुलीवरील भाकरी किंवा चपाती मिळते. सर्रास मांसाहारी जेवण दिले जाते. अपवादात्मक ठिकाणीच शाकाहारी जेवण मिळते. दोन गावाच्या मध्ये आडरानात असे ढाबे आढळतात. ग्रामीण भागात हे ढाबे अतिशय लोकप्रिय झालेले आहेत. तासन्तास वाहन चालवून थकलेल्या चालकाला जेवण मिळावे, गाडी उभा करता यावी व शांतचित्ताने आराम करता यावा; अशी स्थिती ढाब्यावर कायम दिसून येते.

अलिकडे या 'ढाबा' संस्कृतीत विकृतपणा वाढत चाललला आहे. ढाब्यावर खाण्यापेक्षा पिण्यावरच जास्त जोर देत असल्याच्या हकीकती समोर येत आहे. एवढेच नाहीतर याच ढाब्यावर काही मुलींच्या माध्यमातून गैरव्यवहार चालविले जातात. थोडक्यात ढाब्याच्या आडून सेक्स रॅकेट चालविले जात आहे. या ढाब्यावर चालकापासून वेगवेगळ्या व्यवसायाच्या मालकांची वर्दळ दिसून येत आहे. निवडणुका लागल्या की ढाब्याच्या रात्रीचा दिवसच सुरू होतो. याबाबत कोणाचीच कोणाकडे तक्रार नसल्याने पोलीसांचे लक्ष या ढाब्याकडे कमी असते. पोलीसांनी लक्ष देवू नये म्हणून ढाबेवाले त्याची बांधीही करत असतात. यामुळे ढाब्यांना रात्री कधी बंद करायचे हे टाईमलिमिट असत नाही. शहरातील परमिटरूम, बिअरबार या सर्व सुविधा ढाब्यावर खुलेआम चालविले जातात. अलिकडे महाविद्यालयीन विद्यार्थी व तरूण व्यावसायिक पार्टीच्या नादापायी ढाब्यावरती जाऊन उच्छाद मांडतात. अनेकवेळा मद्य पिवून व धुम्रपान करून तरूण ढाब्याच्या बाजेवर किंवा बाजेखाली रात्रभर पडलेले दिसतात. अनेकांना तर उचलून न्यावे लागते. काही कामगार तर पगार झाला की ढाब्यावर हमखास जाणार किंवा किमान ८ दिवसाचा पगार एकाच दिवशी उडवणार आणि उरलेला पगार जुनी उधारी देण्यात संपून टाकणार. पुढील महिनाभर परिवाराने काय करायचे ? काय खायचे आणि त्याने स्वतःतरी काय करायचे ? असे प्रश्न निर्माण होतात. ढाब्याने अशा नको त्या गोष्टींना प्रोत्साहीत केले जात आहे. सेक्स रॅकेट मध्ये तर अनेकांचे संसार उध्वस्त झाले आहेत. तर काही तरूणांचे भविष्य संपलेले आहे. याच ढाब्यावर जुगारीचा क्लब ही काहीजण चालवतात. तर काहीजण पानाच्या टपरीतून बेधडक बंदी असलेले गुटखे व ड्रग्ज ही विक्री करतात. मोकळ्या पटांगणात हे व्यवहार चालत असल्याने आणि राजीमर्जीने होत असल्याने इतरांना हस्तक्षेप करता येत नाही. सामाजिक कार्यकर्ते, राजकीय कार्यकर्ते यांचे समोर यापेक्षा वेगळे विषय असल्याने याकडे फारसे कोणाचे लक्ष जात नाही.

जिथे-जिथे ढाबे आहेत तेथे आकडे लावून फोकस व लाईटच्या माळा लावल्या जातात. जेणेकरून येणाऱ्या प्रवाशांचे लक्ष वेधण्याचे काम हे ढाबे करतात. या ढाब्यावर रेशनींगच्या मालापासून ते खराब भाज्यापर्यंत आणि विदेशी अंड्यापासून ते नको त्या प्राण्याचे मांस ग्राहकांना दिले जाते. ज्यासाठी पुन्हा पुन्हा तळलेले तेल वापरले जाते. दोन-दोन दिवसाची गिरवी वापरली जाते. सडक्या भाज्या, खराब कांदा, सडके लिंबू यांचा मारा याच ढाब्यावर सुरू असतो. स्वयंपाकी चांगला असेलतर असे ढाबे काही दिवस चांगले चालतात, स्वयंपाकी बदलला किंवा काही उपलब्धता थांबली की हे ढाबे बंद पडतात. टेंभूर्णी ते नगर या रस्त्यावर आपण पाहिलेतर शेकडो ढाबे बंद पडले आहेत आणि नव्याने दुसरे ढाबे उभे राहिले आहेत. अर्थातच हे विकृत प्रवृत्तीचे ढाबे उभे करण्यास आणि वाढविण्यास आपणच जबाबदार आहोत. चांगल्या जेवणासाठी व ग्राहकांच्या आरोग्याची काळजी घेणाऱ्या ढाब्याची गरज आहे परंतू ग्राहकांची फसवणूक करून स्वतःसाठी वेगवेगळ्या मार्गातून पैसे कमविणारी ढाबे कुसंस्कृती थांबण्याची गरज आहे.

## २६ नोव्हेंबरला कोतमिरे व करे-पाटील यांचा सत्कार समारंभ

करमाळा (सं.प्र.) : सोलापूर जिल्हा बँकेच्या प्रशासक पदी नेमणूक झाल्यानंतर प्रशासक पदाच्या कालावधीत बँकेची सर्वांगीण व परिपूर्ण प्रगती केल्याबद्दल अप्पर सहाय्यक आयुक्त पुणे चे शैलेज कोतमिरे व इंडोनेशिया येते बायोटेक्नॉलॉजी जैवतंत्रज्ञान कॉन्फरन्ससाठी निवड होऊन यशस्वी दौरा केल्याबद्दल यशकल्याणी सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष गणेश करे-पाटील यांचा ग्रामसुधार समितीच्या वतीने २६ नोव्हेंबरला भव्य सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला आहे. हा सत्कार समारंभ म.शासन सहकार विभागाचे आयुक्त अनिल कवडे यांचे हस्ते होणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्रामसुधार समितीचे अध्यक्ष डॉ.ॲड.बाबूराव हिरडे हे राहणार आहेत. हा कार्यक्रम २६ नोव्हेंबरला सकाळी ११ वाजता यशकल्याणी सेवाभवन, देवी विद्यालय शेजारी पुणे रोड, करमाळा येथे होणार आहे. तरी या कार्यक्रमास नागरीकांनी उपस्थित रहावे; असे आवाहन ग्रामसुधार समितीच्या वतीने करण्यात आले आहे.



भारत हायस्कुल, जेऊरचे उपशिक्षक पांडूरंग वाघमारे यांचे चिरंजीव उदयराज वाघमारे याची एमबीबीएससाठी चिपळूण येथे निवड झाल्या बद्दल करमाळा तालुका चर्मकार शिक्षक बांधवां च्या वतीने सत्कार करण्यात आला.

संदेश
साहित्यिकांना आवाहन
करमाळा तालुक्याचे लोकप्रिय सा.कमलाभवानी संदेशचा वर्धापन दिन विशेषांक लवकरच प्रकाशित होणार आहे. तरी साहित्यिकांनी आपले साहित्य लेख, कविता, चारोळी व इतर तसेच जाहिरातदारांनी आपल्या जाहिराती सा.संदेश कार्यालयात आणून द्यावेत.
संपर्क : मो.९८२२०५८१०६
मो.९४२३२३७६८५

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजुकराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# निलेश यादव यांचा 'बेस्ट मेकअप आर्टिस्ट' म्हणून सन्मान



करमाळा(सं.प्र.) : नाशिक येथील रिसिल कंपनीने आयोजित केलेल्या महाराष्ट्र बिझनेस अॅवार्ड या कार्यक्रमात 'बेस्ट मेकअप आर्टिस्ट' म्हणून करमाळा येथील व्यावसायिक निलेश यादव यांचा सन्मान करण्यात आला आहे. हा कार्यक्रम नाशिक येथील दि ग्रँड सिटी मॉल येथे संपन्न झाला. या कार्यक्रमात मराठी सिनेकलाकार तेजस्विनी पंडित, सोनाली कुलकर्णी आणि प्रकाश भागवत यांची प्रमुख उपस्थिती होती. तेजस्विनी पंडित यांचे हस्ते निलेश यादव यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. निलेश यादव यांनी हेअर अॅन्ड ब्युटी तसेच हेअर अॅन्ड केमिकल(जावेद हबीब) संदर्भात मुंबई, चेन्नई येथे डिप्लोमा करून प्राविण्य मिळवले आहे. करमाळ्यातील कृष्णाजीनगर येथे त्यांचे सई हेअर अॅन्ड ब्युटी अकॅडमी येथे काम करत करत त्यांनी विविध सर्टिफिकेट कोर्स पूर्ण केले. हेअर अॅन्ड ब्युटी क्षेत्रातील त्यांचे योगदान पाहून त्यांना या पुरस्काराने गौरविण्यात आले. त्यांच्या या व्यावसायिक कामात पत्नी आकांक्षा हिचे मोलाचे सहकार्य लाभत असल्याचे यादव यांनी सांगितले.

## राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे करमाळा आगारप्रमुखांना निवेदन

# बारामती मार्गे करमाळा-सातारा बस पुन्हा सुरू करावी



करमाळा(सं.प्र.) : करमाळा ते सातारा (बारामती मार्गे) बस बंद होती. बारामती येथे करमाळा तालुक्यातील असंख्य विद्यार्थी शिक्षणासाठी आहेत. काही विद्यार्थ्यांना त्यांचे पालक हे याच बसने सकाळी दोन वेळेचा डबा पाठवत असतात, पण आता काही दिवसांपासून ही बससेवा बंद होती. बारामतीत सतत ये-जा करणाऱ्या प्रवाशांना देखील याचा त्रास होत होता. म्हणून राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस करमाळा शहर च्या वतीने आगारप्रमुख अश्विनी किरगत यांना ही बससेवा पुन्हा सुरु करण्यासाठी निवेदन देण्यात आले. यावेळी शहराध्यक्ष ऋषिकेश शिगची, उपाध्यक्ष आरशान पठाण, रामेश्वर भरते व कार्यकर्ते उपस्थित होते.

# प्रदीप बेरे याची नॅशनल चॅम्पीयन स्पर्धेसाठी निवड



करमाळा (सं.प्र.) : जेऊर येथील भारत महाविद्यालय मधील बी.ए.भाग-२ चा विद्यार्थी प्रदीप पांडूरंग बेरे याची कुस्तीच्या नॅशनल चॅम्पियन स्पधेसाठी निवड झाली आहे. के.एन.भिसे महाविद्यालय कुर्डूवाडी येथे झालेल्या फ्री स्टाईल कुस्ती स्पर्धेत सलग पाच कुस्त्या जिंकून प्रदीप बेरे याने पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर विद्यापीठा मध्ये ८६ किलो वजन गटात प्रथम क्रमांक मिळवला व नॅशनल चॅम्पियन स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे.

या यशाबद्दल भारत शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष व माजी आमदार नारायण पाटील, उपाध्यक्ष अनिकुमार गादीया, सचिव प्रा.अर्जुन सरक, प्राचार्य डॉ.अनंत शिंगाडे यांनी प्रदीप बेरे याचे अभिनंदन केले.

ओजस हॉस्पिटल
OJS HOSPITAL
AIIOPATHY AYURVED HOMEOPATHY
डॉ.रोहन रामदास कुंभार B.A.M.S. M.D.(Acu) D.G.O. स्त्रीरोग तज्ञ
डॉ.मनोज रामदास कुंभार M.D. कन्सलटींग फिजीशीयन
डॉ.सौ.अंजली रोहन कुंभार B.H.M.S. होमिओपॅथिक कन्सलटंट
* वेळ : सकाळी ८ ते रात्री ८ * * २४ तास अत्यावश्यक सेवा *
डॉ.सौ.सायली मनोज कुंभार M.sc. Biotech, Health & Nutrition आहारतज्ञ
ॲलोपॅथी, आयुर्वेद होमिओपॅथी शास्त्रांच्या संयुक्त चिकित्सा पध्दतीने खालील आजारांवर अचूक निदान व योग्य उपचार ● हृदयरोग व उच्च रक्तदाब ● मधुमेह ● थायरॉईड ● संधिवात ● पोटाचे आजार ● स्त्रियांचे आजार ● श्वसनसंस्थेचे आजार ● मणक्यांचे व हाडांचे विकार ● मुतखडा ● मुळव्याध ● सौंदर्य समस्या ● त्वचारोग व केशविकार ● आहारविषयक मार्गदर्शन..
उपलब्ध सुविधा : ECG, Multipara Monitor, Nebulisation(वाफेची सुविधा)
Glucometer (रक्तातील साखर तपासणी), प्रकृतीपरिक्षण, नाडीपरिक्षण, सुवर्णबिंदू प्राशन(जन्मापासून ते १६ वर्षा पर्यंत)
PAP SMEAR LBC, HPV DNA PCR, VILI & VIA Screening Test
(गर्भाशय मुख कर्करोग पूर्व तपासणीसाठी पुणे येथील नामांकीत लॅब गोलविलकर मेट्रोपोलिसशी संलग्नित)
पत्ता : चिवटे बंधू मिठाईवाले यांच्या समोर, घोलप ज्वेलर्सच्या वरच्या मजल्यावर सुभाष चौक, मेनरोड, करमाळा. ● संपर्क : मो.9960334005, 9423333950

# करमाळा येथे २७ नोव्हेंबरला लेजर खतना कम्प

करमाळा(सं.प्र.) : बहुजन विकास संस्थेच्या वतीने २७ नोव्हेंबरला लेजर खतना कॅम्पचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबीरात सोलापूरचे खतना स्पेशालिस्ट डॉ.नासीर सय्यद हे उपस्थित राहणार आहेत. शिबीराचे उद्घाटन अॅड.नईम हाजी कलीम काझी यांचे हस्ते होणार आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी नगराध्यक्ष शौकत नालबंद हे राहणार असून प्रमुख पाहूणे म्हणून महसुल विभागाचे जेलर समीर पटेल, सादिक काझी, युसूफ बागवान, वहाब खान, महंमद बागवान, इस्माईल पठाण, अॅड.अलिम पठाण, समीरबावा शेख, इकबाल खान, युसूफ शेख, मोहसीन नालबंद, सलीम शेख, अहमद कुरेशी, इसाक इनामदार, अमीन मुलाणी आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. शिबीराच्या सुरूवातीला मौलाना मोहसीन शेख, मुजाहिद सय्यद, कादिर शेख, सिकंदर मुलाणी, मरगबुल हसन, इकराम बागवान, सय्यदअली मुजावर, करी इस्माईल, मुफ्ती अबुरीहान कुरेशी दुवा करणार आहेत. या कॅम्पमध्ये सहभागी होणाऱ्या मुलांची नावे कय्युम शेख (८६००६१७७६२), अजीम मोगल (८३०८६६५६६५), तौफिक शेख (९४२०७८६९००), अमीन बेग (९०७५१७८६८८), दस्तगीर पठाण (८८५५८८५५७१), बबलू पठाण (८४८४००५५८४), जमीर मुलाणी (७५८८०२०७८६) यांच्याकडे नोंदणी करावी.

हे शिबीर २७ नोव्हेंबरला न्यु इरा इंग्लिश मिडीयम स्कूल, नालबंदनगर, हाजी शकील दलाल प्लॉट, अहमदनगर रोड, करमाळा येथे सकाळी नऊ वाजता सुरु होणार आहे. तरी याचा लाभ घ्यावा; असे आवाहन शिबीराचे आयोजक व बहुजन विकास संस्थेचे अध्यक्ष इसाक रमजान पठाण यांनी केले आहे.

# डिकसळ पुलाच्या कामावर बसविलेली स्थगिती उठली : आ.शिंदे

करमाळा(सं.प्र.) : सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पात जिल्हा हद्द कोंढारचिंचोली - खातगाव ते पोमलवाडी रस्त्यावरील पुलाच्या कामासाठी (डिकसळ पुल) ५५ कोटी रूपये निधी मंजूर झालेला होता. परंतू महाविकास आघाडीचे सरकार गेल्यानंतर नव्याने स्थापन झालेल्या सरकारने पूर्वीच्या सरकारने मंजूर केलेल्या सर्वच कामावर २३ जुलै रोजीच्या पत्राद्वारे स्थगिती दिली होती. त्यामुळे डिकसळ पुलाचे काम स्थगित केलेले होते. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ११ नोव्हेंबरच्या परिपत्रकानूसार डिकसळ पुलाच्या कामावर बसविलेली स्थगिती उठविल्याची माहिती आमदार संजयमामा शिंदे यांनी दिली. या पुलाचे काम लवकरात लवकर मार्गी लागण्यासाठी आपण आग्रही असून सोलापूर जिल्ह्यातील करमाळा तालुक्यासह पुणे जिल्हा व अहमदनगर जिल्हा या सर्वांच्या दृष्टीने डिकसळ पुल हा दळणवळणासाठी अत्यंत महत्वाचा असल्याची माहिती आमदार शिंदे यांनी दिली. करमाळा विधानसभा मतदारसंघातील दळणवळण सुलभ होण्याच्या दृष्टीने प्रमुख जिल्हा मार्ग १९० असून पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुका तसेच अहमदनगर जिल्ह्यातील कर्जत तालुका यांना जोडणारा डिकसळ पुल आहे. त्यामुळे पुलाचे काम होणे अत्यंत आवश्यक आहे. या पुलाचे काम झाल्यास ऊस उत्पादक शेतकरी, नागरीक, शालेय विद्यार्थी, रूग्ण यांना रहदारीच्या दृष्टीने सोयीचे होईल.

प्रियंका आय केअर हॉस्पीटल
डोळ्यांच्या आजारावरील निदान व उपचार केंद्र
पुणे रोड, त्रिमुर्ती कुशनचा वरचा मजला, करमाळा.
फोन.222233, मो.नं.9423222266
डॉ.डी.बी.केमकर (M.S.DOMS) नेत्ररोग तज्ञ कन्सल्टिंग ऑफ्थॅलमोलॉजीस्ट व ऑफ्थॅलमिक सर्जन
उपलब्ध सुविधा...
● मोतीबिंदू, काचबिंदू, नासूर, तिरळेपणा, दृष्टिदोष वरील निदान व उपचार
● जपानच्या अत्याधुनिक मशीनव्दारे शास्त्रोक्त पध्दतीने तपासणी व उपचार
● फॅकोइमलसीफिकेशनी बिनटाक्याची मोतीबिंदू वरील शस्त्रक्रिया.
● सुसज्ज ऑपरेशन थिएटर ● एस्कॅन बायोनेट्री आणि केरॉटोमॅट्री
● जपानच्या अत्याधुनिक कॉम्प्युटरवर नेत्र तपासणी व चष्म्याचे नंबर काढण्याची सोय
● नेत्रपटल आजाराचे निदान व उपचार ● लेसर मशीनव्दारे लेन्स वरील जाळी काढण्याची सोय
वेळ : सकाळी १० ते ६ (सोमवार ते शनिवार)
अत्याधुनिक प्रकारची लेझर सुविधा उपलब्ध ! (Nd YAG LASER) रविवारी बंद
सिध्दीविनायक ऑप्टीकल्स् आमच्याकडे नंबरचे चष्मे व गॉगल्स योग्य दरात मिळतील.
बॅक ऑफ इंडिया शेजारी, बसस्टॅन्ड समोर, करमाळा. प्रोप्रा : वर्षा गायकवाड मो.९५२७२६८१८१/७७५६८२५८२६

इथं सौंदर्य जन्म घेतं..
मो.9172092187
प्रोप्रा : मुन्नाशेठ हासिजा
होलसेल साडी डेपो
सुरतच्या होलसेल भावात साड्या मिळतील.
घरगुती विक्रीसाठी साड्या होलदरात मिळतील
लखमीचंद क्लॉथ स्टोअर्स भवानीपेठ, करमाळा.
अॅड.आशुतोष ल.हासिजा (मुंबई हायकोर्ट) मो.7387832186

# कार व मोटारसायकल अपघात-जातेगाव येथील युवकाचे निधन



करमाळा(सं.प्र.) : करमाळा-अहमदनगर रोडवरील जातेगाव जवळ कार व मोटारसायकलच्या अपघातात मोटारसायकल स्वार गंभीर जखमी होऊन उपचारापूर्वी ठार झाला आहे. हा अपघात १६ नोव्हेंबर रोजी सायंकाळी सव्वासात वाजण्याच्या सुमारास घडला आहे. या प्रकरणी सुरेश भानुदास ससाणे यांनी करमाळा पोलीसात फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले की, मी भैरवनाथ मंदिरात असताना आमच्या गावातील दत्तात्रय एकनाथ शिंदे यांनी मला फोनद्वारे कळविले की करमाळा-अहमदनगर रोडवरील जीनभवानी हॉटेल समोर तुमचा मुलगा नितीन ससाणे याचा अपघात झाला आहे. त्यावेळी मी तातडीने त्या ठिकाणी गेलो असता, त्या ठिकाणी मुलगा गंभीर जखमी अवस्थेत पडलेला दिसला. माझा मुलगा नितीन सुरेश ससाणे (वय-३०) हा दररोज मोटारसायकल क्र.एमएच ४५ व्ही ४९६४ ने वीट येथे खाजगी कंपनीमध्ये स्टोअर कीपर म्हणून काम करण्यासाठी जात असतो. १६ नोव्हेंबर रोजी कामासाठी जात असताना जातेगावहून करमाळ्याकडे जाताना करमाळ्याहून अहमदनगरकडे जाणारी गाडी क्र.एमएच १३ डीई ६३२८ या वाहन चालकाने माझा मुलगा नितीन यास समोरून जोराची धडक दिली. त्यात माझ्या मुलाचा उजवा पाय तुटलेला आहे. तसेच डोक्यावर व शरीरावर गंभीर दुखापत होऊन रक्त येत होते. मुलगा नितीन बेशुध्द अवस्थेत पडलेला होता. त्यानंतर तातडीने मी माझा दुसरा मुलगा अमोल ससाणे व गावातील लोकांनी खाजगी वाहनातून उपचाराकरीता उपजिल्हा रूग्णालय करमाळा येथे आणले. त्यावेळी प्राथमिक उपचार करून वैद्यकिय अधिकाऱ्यांनी सिव्हील हॉस्पिटल सोलापूर येथे जाण्यास सांगितले. परंतू नितीन हा गंभीर जखमी असल्याने त्यास अहमदनगर येथील साईदिप हॉस्पिटल येथे उपचारासाठी पाठवले. परंतू उपचारापूर्वीच त्याचे निधन झाले. या प्रकरणी करमाळा पोलीसांनी वाहनचालकावर गुन्हा दाखल केला आहे.

# करमाळा शहरात कल्याण मटका घेणाऱ्याविरूध्द पोलीसांची कारवाई

करमाळा (सं.प्र.) : करमाळा शहरात गायकवाड चौकात कल्याण मटका घेणाऱ्याविरूध्द पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे. हा प्रकार १० नोव्हेंबरला सायंकाळी पावणेचार वाजता घडला आहे. या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल अतुल सर्जेराव लवळे यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की करमाळा शहरातील गायकवाड चौकात एकजण कल्याण मटका घेत असल्याची माहिती समजल्यावर आम्ही तेथे छापा टाकला असता, तेथे रज्जाक गफूर फकीर (वय-६०, मानेवस्ती, पुणे रोड) हा कल्याण मटका घेत असताना आढळून आला. त्याचेकडे रोख रक्कम ४१० रू. , आकडेमोड केलेली लहान डायरी व निळ्या शाईचा बॉलपेन सापडलेला आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# एसटी बस खड्ड्यात पडली - प्रवासी जखमी

करमाळा (सं.प्र.) : करमाळा येथील मोरवड-करमाळा ही बस खड्ड्यात पडल्याने एसटी मधील प्रवासी जखमी झाले असून, त्यांचेवर येथील उपजिल्हा रूग्णालयात उपचार करण्यात आले आहेत. हे प्रवासी किरकोळ जखमी झाले आहेत. या प्रकरणी बस चालकाविरूध्द करमाळा पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यात बसस्थानकप्रमुख संजय विठ्ठल कदम यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की १३ नोव्हेंबरला सकाळी साडेसात वाजता मोरवडहून करमाळा येथे येत असलेल्या एसटी बस क्र.एमएच १४ बीटी ०७९४ ही बसचालक भारत लक्ष्मण नलवडे यांनी हयगयीने चालवून व रस्त्याची परिस्थिती न बघता रस्त्याच्या कडेला खड्ड्यात घालून झाडास धडकावून बसचे नुकसान केले. तसेच प्रवासी जखमी झाल आहेत. यात रेखा केशव शिंदे, केशव नामदेव शिंदे, चक्रधर एकनाथ कांबळे, श्रीरंग बापू नाळे, प्रणाली पोपट मोहोळकर (सर्व रा.मोरवड) तसेच वाहक संतोष दशरथ गायकवाड हे किरकोळ जखमी झाले आहेत. पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# ४० हजार रूपये किंमतीच्या बीएमडी मशीनची एसटीतून चोरी

करमाळा(सं.प्र.) : हाडाची घनता मोजणाऱ्या ४० हजार रूपये किंमतीच्या बीएमडी मशीनची करमाळा एसटीमध्ये चोरी झाली आहे. हा प्रकार ११ नोव्हेंबरला सकाळी साडेसहा वाजता घडला आहे. यात आरोग्य सुविधा पुरविणारे महेंद्र ज्ञानेश्वर कापडी रा.कात्रज, पुणे यांनी फिर्याद दिली आहे.

त्यात त्यांनी म्हटले आहे, की ११ नोव्हेंबरला करमाळा येथील डॉ.भोसले यांनी पेशंटच्या हाडाची घनता मोजण्यासाठी बीएमडी मशीन पाठवून देण्याबाबत सांगितले होत. त्यानूसार सदरची मशीन आमचा कर्मचारी विशाल अमर राठोड हा ११ नोव्हेंबरला सकाळी साडेचार वाजता मुंबई-करमाळा गाडीने करमाळा येथे आला. त्यावेळी सकाळी साडेसहा वाजता सदर बसमध्ये ४० हजार रूपये किंमतीची बीएमडी मशीन ही कोणतीतरी मुद्दामहून चोरून नेल्याचे लक्षात आले.

याप्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास चालू आहे.

# शिष्यवृत्ती परीक्षेत भारत हायस्कुल मधील विद्यार्थ्यांचे घवघवीत यश



करमाळा(सं.प्र.) : माध्यमिक शालांत शिष्यवृत्ती परीक्षेत भारत हायस्कूल जेऊर येथील अनेक विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. तसेच उल्लेखनीय बाब म्हणजे करमाळा तालुक्यातील सर्वात जास्त शिष्यवृत्तीधारक असणारी एकमेव प्रशाला आहे. त्याबद्दल संस्था अध्यक्ष व माजी आमदार नारायण पाटील, उपाध्यक्ष व माजी सरपंच अनिलकुमार गादीया, संस्था सचिव अर्जुन सरक, मुख्याध्यापक दहिभाते, पर्यवेक्षक कांबळे यांनी यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे श्रीफळ व गुलाबपुष्प देऊन अभिनंदन केले.

तीन मजली इमारत
भाड्याने देणे आहे
कुटीर रूग्णालय समोरील करमाळा-जेऊर रोडवरील नवीन बांधकाम असलेली तीन मजली इमारत भाड्याने देणे आहे



वैशिष्ट्ये
- आठ गुंठे जागा • ५००० स्के.फूट बांधकाम
- स्वतंत्र कंपाऊंड • जनरेटर व सोलरची सुविधा
- तिसऱ्या मजल्यावर राहण्याची उत्तम सोय.
- वॉचमन, बोअर, लाईट आदी सुविधा आहेत.
- हॉस्पीटल, बँक, ऑफिस किंवा हॉटेल-लॉजींगसाठी उपयुक्त

संपर्क : मो.9421286040 / 9421256040

कांदा बियाणे विकणे आहे
मलवडी येथे शास्त्रीय पध्दतीने तयार केलेले व चांगली उगवण क्षमता असलेले डबल पत्ती, दर्जेदार, पंचगंगा पुना फुरसुंगी, गावरान कांद्याचे बी उपलब्ध आहे. तरी सदरचे कांद्याचे बी योग्य दरात विकणे आहे.
संपर्क : श्री.सुभाष मंगवडे(मलवडी)
मो.9423526508, 9373156147

शिवश्री क्लिनिक
डे केअर सेंटर
डॉ.आशुतोष पोपट कापले
B.H.M.S.(M.U.H.S.) Nasik
जनरल फिजीशियन अ‍ॅन्ड होमिओपॅथिक कन्सल्टन्सी
मो.9860982072

उपलब्ध सुविधा...
- ॲडमिट करण्याची सुविधा.
- ई.सी.जी. सुविधा
- बालरूग्णांसाठी वाफेची सुविधा

२४ तास अत्यावश्यक सुविधा
• वेळ : सकाळी ११ ते रात्री १०

आमची वैशिष्ट्ये....
- सर्व आजारांवर ॲलोपॅथिक, होमिओपॅथिक उपचार.
- मुळव्याध, त्वचा विकार उपचार.
- मानसिक आजारांवर उपचार.
- नपुसंगतेवरील उपचार.
- आहारासंबधी योग्य मार्गदर्शन.
- मशीनव्दारे रक्तातील शुगर(BSL) व Blood Precesure तपासणी व उपचार.
- जुनाट मधुमेहातील जखम व संधिवात विकारांवर उपचार

टीप भारतीय सैन्य दलातील जवानांची तपासणी फी घेतली जाणार नाही.

अहमदनगर येथील प्रसिध्द किडनीविकार तज्ञ
डॉ.आनंद काशिद (मुत्रविकार तज्ञ, लैंगिक विकार तज्ञ व किडनी ट्रान्सप्लान्ट सर्जन)
प्रत्येक महिन्याच्या पहिल्या रविवारी, करमाळा येथे
ओपीडी वेळ सकाळी १० ते १.००

पत्ता : सचिन मेडिकल समोर, B.M. कॉम्प्लेक्स, दत्तपेठ, करमाळा.

# जीन मैदानातील व्यापारी संकुल समस्येच्या गर्तेत






सन २००५ ला सुरू झालेल्या या व्यापारी संकुलाचे जसजसे टप्प्याने बांधकाम झाले तसतसे हे गाळे व्यावसायिकांना लिलाव करून उपलब्ध करून दिले. २०१४ पर्यंत व्यापारी संकुलाचे काम पूर्ण झाले व सर्व गाळे व्यावसायिकांना उपलब्ध करून दिले. सन २००५ ते २०१४ या कालावधीत हे व्यापारी संकुल टप्प्याटप्प्याने बांधण्यासाठी त्यावेळीचे जवळपास अडीच कोटी रूपये खर्च करण्यात आला. असे असलेतरी आज या व्यापारी संकुलाची दक्षा पाहवत नाही. अनेक गाळे पावसाळ्यात गळतात. व्यावसायिक त्याला डागडुजी करून वापरत आहेत. अनेक ठिकाणी टेरेस वरचे कठडे पडलेले दिसतात, आहेत ते कठडे सुध्दा भक्कम नाहीत. काही ठिकाणी त्यांचे गज उघडे पडले आहेत. व्यापारी संकुलाला केलेले कलरिंग काम कुठे विरून गेले कळत नाही. व्यापारी संकुलाच्या परिसरात सिमेंटचे रस्ते अथवा सिमेंटचे ब्लॉक्स टाकले नसल्याने रस्त्यावरचा धुरळा थेट दुकानात उडून जातो. याचा व्यावसायिकांना त्रास होतो. व्यापारी संकुलात विविध ब्लॉक्स मध्ये बांधलेले स्वच्छतागृह पूर्णपणे अस्वच्छतागृह बनलेले आहेत. स्वच्छतागृहाची काही लोकांनी मोडतोड केलेली दिसते. दारे गायब झालेली दिसतात. ती इतकी अस्वच्छ बनली आहेत की इथे कुणी पाऊलच ठेऊ शकत नाही. यामुळे इथे येणारे लोक उघड्यावर लघुशंका करताना दिसतात.

संकुलातील सर्व गटारी उघड्या स्वरूपाच्या आहेत. गटारी वेळोवेळी स्वच्छ न केल्यामुळे येथे डासांची मोठी पैदास झालेली आहे. या डासांचा त्रास या व्यावसायिकांना होतो व दिवसभर मच्छर कॉइल त्यांना लावावी लागते. तसेच गटारीतील दुर्गंधी त्याचप्रमाणे उघड्यावर केलेली लघुशंका याचा दुर्गंध या व्यापारी संकुलात पसरलेला जाणवतो. नगरपालिकेच्या पाण्याचा एकच नळ या संकुलाला असल्याने ते पाणी सर्वांमध्ये कसे पुरेसे होणार ? हा एक प्रश्न आहे. इथे अनेक ठिकाणी वायर उघड्या असल्याने त्याचा करंट बसण्याची भिती आहे.

संकुलाजवळ दारूचे दुकान असल्याने सायंकाळी रात्री खुलेआम दारू पिणाऱ्यांचे जथ्थे बसलेले असतात. त्यांचा व्यावसायिक व ग्राहकांना त्रास होतो. वरच्या खोल्यांची वाईट अवस्था आहे. रात्री पार्टी करणाऱ्यांनी टेरेसवरील पाण्याच्या टाकीची मोडतोड केलेली दिसते. टेरेसवर जाणाऱ्या जिन्यावरील रूमची दारे तोडलेली दिसतात. काही ठिकाणची पत्रेच गायब केलेले दिसतात. टेरेसवर झुडपे उगवलेली आहेत. व्यापारी संकुलाचा जो मध्यभाग आहे जिथे कारंजा वैगरे तयार करण्याचा प्लॅन होता तिथे आता फक्त झाडे झुडपे आणि कचरा साठवण्याचे ठिकाण झाले आहे.

या व्यापारी संकुलामध्ये कुठल्याही प्रकारची सुरक्षितता अथवा सुरक्षा रक्षक नसल्याने कुणीही इथे येऊन मोडतोड करून जातेय. संकुलाला अस्वच्छ आणि विद्रुप करून ठेवले आहे. ठिकठिकाणी गुटखा, मावा खाऊन भिंतीवर थुंकून भिंती विद्रुप केल्या आहेत. दारू पिणाऱ्यांनी फेकलेल्या बटाट्याचा येथे खच पडला आहे. येथे जो बोअर घेतला होता, त्या बोअरची मोटार चोरीला गेली आहे. इथे अनेक वेळा व्यावसायिकांची शटर उचकटून चोरीचा प्रयत्न केला आहे तर काही वेळा प्रत्यक्षात चोरी देखील झाली आहे. त्यामुळे इथे सुरक्षित कंपाऊंड, सुरक्षा रक्षक, सीसीटीव्ही आदी गोष्टींची गरज आहे.

इथे मुख्य प्रवेशद्वार गेट गेली कित्येक वर्ष लावले सुध्दा जात नाही. त्यामु त्याच्यावर झाडाचे वेल तयार झाले आहेत. कॉम्प्लेक्सच्या बाहेर हातगाडीवाल्या व्यावसायिकांना जागा करून दिली आहे, परंतू तिथल्या अस्वच्छतेमुळे, काटेरी झुडूपांमुळे तसेच समोरच विविध पार्क केल्या जाणाऱ्या चारचाकी गाड्यांच्या राड्यामुळे हातगाडी व्यावसायिकांनी तिथे पाठ फिरवली. येथे स्वच्छता नाही, मेन्टेनन्स नाही, सुरक्षा नाही यामुळे इथे मोठ्या उलाढाली करणारे व्यावसायिक व्यापारी येत नाहीत. जर याच व्यापार संकुलाचा अजून चेहरा–मोहरा बदलला, सुरक्षितता, स्वच्छता, सुविधा उपलब्ध करून दिल्या तसेच अपूर्ण राहिलेले संकुलाचे गाळे पूर्ण केले व अजून वरती दोन–तीन मजले बांधले तर त्याचा फायदा व्यावसायिकांना व नगरपालिकेला होऊ शकतो.

त्याच्याच बाजुला जिल्हा क्रिडा संकुलाच्या अधिपत्याखाली जीन मैदान विकसित करण्यात आले, परंतू त्याची अवस्था देखील तितकीच वाईट आहे. इथे फक्त काही राजकीय कार्यक्रम आयोजित केलेतरच त्याची स्वच्छता होते अन्यथा इतर वेळी खेळाडूंना हे मैदान असून अडचण नसून खोळंबा.. झाले आहे. याच्या स्वच्छतागृहांची देखील तितकीच वाईट अवस्था आहे. इथे देखील मोडतोड झालेली पाहायला मिळते. त्यामुळे इथे देखील लोक बाहेरच उघड्यावर लघुशंका करतात. स्टेडियममध्ये प्रेक्षकांना बसण्याच्या स्टॅन्डचे नियोजन चांगले असलेतरी त्याचा दर्जा चांगला नसल्याने ते लवकरच बाद होऊ शकते. याबाबी चांगल्याप्रकारे करण्यासाठी प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन सुधारणा करण्यात याव्यात; अशी मागणी व्यापारी व नागरीकांनी केली आहे.







# पुढील काळात समाजसेवेला प्राधान्य देणार : राजेंद्र बारकुंड

करमाळा(सं.प्र.) : समाजाची सेवा करणे व समाजातील दुर्लक्षित घटकाच्या मदतीला धावून जाणे हेच आता जीवनाचे उद्दीष्ट असून, येथून पुढील काळात समाजसेवेला प्राधान्य देणार; असे मत सोलापूर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष राजेंद्र बारकुंड यांनी व्यक्त केले.

राजेंद्र बारकुंड यांच्या वाढदिवसानिमित्त बाळासाहेबांची शिवसेनेच्या वतीने जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांचे हस्ते बारकुंड यांचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी सत्काराला उत्तर देताना बारकुंड यांनी आपली भुमिका स्पष्ट केली. यावेळी शिवसेनेचे उपतालुका प्रमुख दादा थोरात, शिवसेना डॉक्टर सेलचे तालुका अध्यंक्ष डॉ.बाळासाहेब कारंडे, उपशहरप्रमुख नागेश गुरव, युवा सेना शहरप्रमुख विशाल गायकवाड





हिवरवाडी शाखा प्रमुख आजिनाथ इरकर आदी पदाधिकारी उपस्थित होते.

या सत्काराला उत्तर देताना पुढे बोलताना बारकुंड यांनी आता इथून पुढे राजकारणापेक्षा समाजसेवेला महत्व देणार असून सामाजिक प्रश्न सोडवण्यासाठी पुढाकार घेणार असल्याचे सांगितले.

राजेंद्र बारकुंड यांनी दरवर्षी चिखलठाण परिसरातून शैक्षणिक गुणवत्ता मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्याचा कार्यक्रम घेण्याचा उपक्रम सुरू केला आहे. या परिसरातील शेतकऱ्यांना ऊसाच्या तोडणीसाठी अनेक कारखान्याशी चांगले संबंध ठेवून शेतकऱ्यांना मदत मिळवून देतात.

सोलापूर जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष म्हणून तीन वर्षे काम पाहत असताना त्यांच्या हातून संपूर्ण तालुक्यात विकासकामे झालेली आहेत. आज दिवसभर बारकुंड यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी त्यांच्या निवासस्थानी समर्थकांनी तसेच सामाजिक, शैक्षणिक, राजकीय व धार्मिक क्षेत्रातील नागरीकांनी गर्दी केली होती.

# दत्तकला इंटरनॅशनल स्कुल व सीबीएसई स्कुल मध्ये पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती साजरी

करमाळा(सं.प्र.) : दत्तकला इंटरनॅशनल स्कुल व दत्तकला सीबीएसई स्कुल येथे भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहूणे म्हणून दत्तकला शिक्षण संस्थेच्या सचिव माया झोळ उपस्थित होत्या. नेहरूजींच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरूवात झाली. यावेळी प्रताप कडू यांनी नेहरूजींचे लहान मुलांबद्दल असलेले प्रेम यावर आपले विचार व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी भाषणामधून पंडित नेहरूंचे विचार सांगितले.

सीबीएसई विभागात बालदिनाचे औचित्य साधून स्टूडंट लिड कॉन्फरन्स हा उपक्रम राबविण्यात आला. यामध्ये शिक्षकांची भुमिका विद्यार्थ्यांनी पार पाडली. तसेच अभ्यासक्रमातील काही विषय सचिव माया झोळ यांचे समोर सादर केले. या कार्यक्रमास प्राचार्या नंदा ताटे, सिंधू यादव तसेच विभाग प्रमुख धर्मेंद्र धेंडे, संगीता खाडे यांचेसह विद्यार्थी, कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांचे आभार प्रा.निलेश पवार यांनी मानले.






Janvi Enterprises
जान्हवी एंटरप्रायजेस संचलित,
नागराज उद्योग समुहाचे
नागराज ठिबक
शेतकऱ्यांना परवडेल अशा दरात
नॉन ISI 16 mm व 20 mm दर्जेदार
ठिबक आता करमाळा तालुक्याबरोबरच
संपूर्ण जिल्ह्यात उपलब्ध.

प्रोप्रा. वैभव वसंतराव पोळ
JAIN शासन अनुदान प्राप्त ISI मार्क
जैन ठिबक योग्य दरात मिळेल.
जुने ठिबक विकत घेतले जाईल.
जैन टिश्यूकल्चर केळीची रोपे
तात्काळ उपलब्ध.
नागराज मशिनरी, शेटफळ
मो. 7620654141
9890462836
कंपनी गट नं. 93, शेटफळ(ना.) ता. करमाळा, जि. सोलापूर

श्री जगदंबा टूर्स ॲन्ड ट्रॅव्हल्स्
पांडे, ता.करमाळा., जि.सोलापूर

आपल्या लाडक्या मुला-मुलीच्या
लग्नाच्या शुभकार्यासाठी किंवा
इतर समारंभासाठी ४० प्रवासी
सीट असलेली टाटा बस
भाड्याने मिळेल
आमच्याकडे क्रुझर तसेच ईरटिगा व स्विफ्ट डिझायर इ. गाड्या
योग्य दरात भाड्याने मिळतील.
करमाळा - पुणे - करमाळा डेली बससेवा
लवकरच आपल्या सेवेत..!
जाण्याचा मार्ग : वीट, कोर्टी, कुंभारगाव, जिंती, भिगवण, हडपसर, स्वारगेट, शिवाजीनगर, काळेवाडी, डांगे चौक
● पार्सल सेवा व महिलांसाठी राखीव सीट
● वेळ : सकाळी ५ वा. ४५ मि.
● ठिकाण : करमाळा एस.टी.स्टॅन्ड समोर, हॉटेल मुक्ताई शेजारी., करमाळा.

संपर्क
प्रशांत कांबळे (9921404775 / 7057067003)
संतोष कांबळे (7741020164), किरण कांबळे (9822285691)
नाशिर मुलाणी (7058405022), समीर तांबोळी (9623635027)


गुरूकुल पब्लिक स्कुलची
इ.९ वी मधील विद्यार्थीनी
कु.वैष्णवी कुमार पाटील
हिने ज्युनियर राष्ट्रीय धनुर्विद्या
स्पर्धेत चार पदके पटकावून
करमाळा तालुक्याचे नाव
देशपातळीवर पोहोचविल्याबद्दल
तिचे मन:पूर्वक
हार्दिक अभिनंदन !
शुभेच्छुक
गुरूकुल पब्लिक स्कुल
पांडे रोड, ता.करमाळा, जि.सोलापूर

Place to chill and dine
SPOTLIGHT HOTEL
FAMILY RESTAURANT
VEG NON-VEG

स्पेशल डिश...
पनीर तुफानी
पनीर मटका कबाब
चिकन तलवारी
वैशिष्ट्ये...
● फ्री वाय-फाय
● खास फॅमिलीसाठी
● प्रशस्त पार्किंग
● फोटो शूटसाठी निसर्गरम्य पॉईंट
चिकन तुफानी
आमच्याकडे बर्थडे, ॲनिवर्सरी पार्टीचे बुकींग घेतले जाईल.
करमाळ्यात
फ्री होम डिलीव्हरी
(सकाळी ११ ते रात्री ११ पर्यंत)
करमाळा-कर्जत रोड (नागोबा मंदिर पासून १ कि.मी)
मो.9699175956, 9579516545, 9145213173

आदिनाथचे ७० टक्के काम पूर्ण-३० टक्के काम पैसे अभावी रखडले

# आदिनाथ चालू करण्यासाठी सभासदांनी आर्थिक सहकार्य करण्याचे आवाहन

करमाळा(सं.प्र.) : आदिनाथ सहकारी साखर कारखाना यंदाच्या गळीत हंगामात सुरू करण्यासाठी चार कोटी रुपये लागणार आहे. कारखान्याचे ७० टक्के काम पूर्ण झाले असून ३० टक्के काम पैसे अभावी रखडले आहे. आदिनाथ चालू करण्यासाठी सभासदांनी आर्थिक सहकार्य करावे; असे आवाहन हरिदास डांगे, डॉ.वसंतराव पुंडे यांनी केले आहे.

आदिनाथ सहकारी साखर कारखाना करमाळा तालुक्याचे वैभव असून आदिनाथ कारखान्याचे ३० हजार सभासद आहेत. यामधील प्रत्येक सभासदांनी कारखाना चालू करण्यासाठी योगदान देणे गरजेचे असून सध्याच्या परिस्थितीमध्ये आदिनाथ कारखाना चालू करण्यासाठी पैशाची अत्यंत गरज असून चार कोटी रुपये जमा झाल्यास आदिनाथ कारखाना सुरू करण्यास सहकार्य होणार आहे. आत्तापर्यंत सभासदांकडून ४५ लाख रुपये जमा झाले आहे. त्याचबरोबर आदिनाथचे जे सभासद आहे. त्यांनी आपले अपूर्ण शेअर्स पूर्ण करून घ्यावेत. येणाऱ्या निडणुकीमध्ये शेअर्सची संपूर्ण रक्कम भरणाऱ्या सभासदाला आदिनाथ सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीसाठी मतदान करता येणार आहे. त्यामुळे सर्वांनी या गोष्टीचा विचार करून आपले शेअर्स पूर्ण करून घ्यावेत. आदिनाथ कारखाना चालू करण्यासाठी मंत्री तानाजी सावंत यांनी मोठे सहकार्य केले आहे. माजी आमदार नारायण पाटील, बागल गटाच्या नेत्या रश्मी बागल यांचेही सहकार्य मिळत आहे.

# संभाजी ब्रिगेड तालुका कार्यकारिणीची पुर्नगठण बैठक संपन्न



करमाळा (सं.प्र.) : संभाजी ब्रिगेड तालुका कार्यकारिणीची पुर्नगठण बैठक जिल्हाध्यक्ष सचिन जगताप यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीला संभाजी ब्रिगेडचे जिल्हा उपाध्यक्ष शंकर पोळ, जिल्हा संघटक गणेश सव्वाशे, माजी जिल्हा संघटक गणेश कुकडे, तालुका अध्यक्ष अमित घोगरे, तालुका उपाध्यक्ष विशाल पाटील, तालुका कार्याध्यक्ष राजेश ननवरे, तालुका संघटक मयुर सावंत, हनुमंत घोरपडे, शहराध्यक्ष वैभव माने, मराठा सेवा संघाचे तालुका अध्यक्ष अतुल वारे यांचेसह माढा तालुका अध्यक्ष अजय गायकवाड, सचिन काळे, महेश गोडसे, राजेश पोळ, अशोक अडसुळ, शकील शेख, अजित गोसावी, अनिकेत पवार, अनिकेत मोरे, धैर्यशील कुंभार, कृष्णा फुटाणे, श्रीकांत निंबाळकर, आप्पा नाळे, ओंकार माने, सुमित पवार, ओम वाघमोडे, दादा तांबिले, कृणाल फंड, योगेश गुरव, समीर बदर इ. उपस्थित होते.

# युनियन बँकेने शहरात एटीएमची संख्या वाढवावी

## करमाळा शहर भाजपा व्यापारी आघाडीचे निवेदन



करमाळा(सं.प्र.) : गेली अनेक वर्षापासून युनियन बँक ऑफ इंडिया बँकेची शाखा करमाळा शहरातील मेनरोड वर होती. आता या शाखेचे स्थलांतर शहराबाहेर श्रीदेवीचामाळ रोड येथे झाले आहे. सध्याच्या स्थितीत या बँकेत शहर व तालुक्यातील लहान-मोठे व्यापारी आणि इतर सामान्य खातेधारकांची संख्या जास्त आहे. शाखेच्या स्थलांतरामुळे व्यापारी तसेच ग्रामीण भागातील अनेकांची गैरसोय होणार आहे. खातेदारांची गैरसोय होऊ नये म्हणून बसस्थानकापासून जवळ अंतरावर करमाळा शहरातील मुख्य रस्त्यावर एटीएम, सीडीएम तसेच ग्राहक सेवा केंदची सोय करावी. तसेच शहरामध्ये एटीएम सेंटरची संख्या वाढवावी; अशी मागणी भाजपा व्यापारी आघाडीच्या वतीने शहराध्यक्ष जितेश कटारिया यांनी करमाळा शाखा व्यवस्थापक आणि मुख्य कार्यालय अहमदनगर यांचेकडे निवेदनाव्दारे केली आहे. यावेळी संजय गांधी निराधार योजनेचे नरेंद्र ठाकूर, निलेश माने, ओंकारराजे निंबाळकर, निखिल मोरे यांच्यासह व्यापारी उपस्थित होते.

# केवाबाई बंडगर यांचे निधन


करमाळा(सं.प्र.) : उमरड येथील केवाबाई अर्जुन बंडगर यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांचेवर उमरड येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी ग्रामस्थ उपस्थित होते.

न्यू प्रविण सुपर मार्केट
• बोल्ड नं.१ बदाम - ६०० रू. किलो
• नं.१ काजू - ७०० रू.किलो
• पिस्ता - २५० रू. पावकिलो
• मनुका - ६० रू. पावकिलो
• खजूर (डेटक्राऊ) - १४० रू अर्धाकिलो
• खजूर - ७० रू. अर्धाकिलो
• केळी वेफर्स - १०० रू. अर्धाकिलो
• जोडगहू - ६० रू. किलो
• पाणीपुरी - २५ रू. पावकिलो
• पॉपकॉर्न मका - ३० रू. पावकिलो
• मोहूरी(बारीक) - ८० रू. किलो
• महावीर पापड - ११० रू. अर्धाकिलो
• नाचणी - ५० रू.किलो
स्पेशल कडधान्य...
• नवीन बेस्ट मटकी - ९० रू. किलो
• मटकी स्पे.गावरान - १३० रू. किलो
• काबोली - ८० रू. किलो
• वटाणा हिरवा - ६० रू. किलो
• मुग(बारीक) - ८५ रू.किलो
• चवळी - ७० रू.किलो
• अख्खा मसुर - ९० रू.किलो
• पाणीपुरी वटाणा - ७० रू. किलो
• शाबुदाणा - ६० रू.
गुळभेंडी, सुरती, हूरडा बी मिळेल.
• नं.१ २१८९ गहू - ३४ रू.किलो
• नं.१ २४९६ गहू - ३५ रू.किलो
• ज्वारी(बेस्ट) - ५० रू.किलो
• नं.१ बाजरी - ३० रू.किलो
संपर्क
ज्योती-क्रांती बँकेच्या शेजारी, दत्तपेठ, करमाळा
मो.9168052318

घर विकणे आहे
नागोबा मंदिराजवळ असलेले दोन मजली आरसीसी घर (इमारत) योग्य किंमतीत विकणे आहे
संपर्क : 9730937300 / 7057235778

आनंद ड्रायफ्रुटस्
स्वादीष्ट व चविष्ट उपवासाचे पदार्थ तसेच ड्रायफ्रुटस् मिळण्याचे ठिकाण
होलसेल व रिटेल विक्रेते...
ऑफर मर्यादित कालावधीसाठी
ड्रायफ्रुटस्, नमकीन, उपवास पदार्थ, मुखवास, बेकरी, लोणचे, चटणी मसाले, पापड व आणखीन भरपूर काही मिळेल.
नं.१ बोल्ड बदाम - ६२० रू.किलो
काजू - ६९० रू. किलो
पिस्ता - २४० रू.पावकिलो
मणुका - ६० रू.पावकिलो
खजूर(डेटक्राऊन कंपनी) - १३० रू.अर्धाकिलो
खजूर - ७० रू.अर्धाकिलो
प्रोप्रा : अमोल र. हिरण
मो.९२७०४९६८६७/७०५७२५८३८५
संपर्क : एच.यु.गुगळे कापड दुकान समोर, मेनरोड, करमाळा.


Pure Veg
करमाळा शहरात नव्याने सुरू..
Pizza Bite
शुध्द शाकाहारी
• पिझ्झा • बर्गर • सॅन्डवीच • मिल्कशेक
• फ्रेंचफ्राय इ. प्युअरव्हेज मध्ये मिळेल.



प्रोप्रा : वसीम मुजावर (मो.९८२३२४६३७७)
पत्ता : कमलादेवी रोड, भारत पेट्रोपंपासमोर, करमाळा.

श्री.मुजावर सर (9423732646)
सनराईज इंग्लीश क्लासेस
इ.१ ली ते १० वी
मराठी/सेमी/इंग्रजी
CBSE माध्यम
स्पोकन इंग्लिशची स्पेशल बॅच- बेसिक, इंटरमेडिएट व ॲडव्हान्स कोर्सेस
वैशिष्टये : • प्रशस्त हॉल • डिजीटल क्लासची संकल्पना
• संपूर्ण क्लास सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या कक्षेत • नियमित चाचणी परीक्षा
• प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र आसन व्यवस्था
• विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व अभ्यासासाठी प्रेरणा
• विद्यार्थ्यांचा इंग्लिश विषयाचा परिपूर्ण आणि सर्वांगीण विकास
पत्ता : आदित्य प्लाझा, भवानी नाक्याजवळ, संताजीनगर, करमाळा.

आर.एस. सप्लायर्स
सर्व प्रकारची खडी, क्रशसॅन्ड, वॉशसॅन्ड प्लास्टरसॅन्ड व डस्टसॅन्ड सप्लायर्स



प्रोप्रा : रियाज मुजावर, 9730961586/9423337477

# शिवसेना-युवा सेनाच्या वतीने स्व.बाळासाहेब ठाकरे यांना अभिवादन



करमाळा(सं.प्र.) : हिंदुहृदय सम्राट शिवसेनाप्रमुख स्व.बाळासाहेब ठाकरे यांच्या दहाव्या स्मृतीदिनानिमित्त करमाळा तालुका शिवसेना युवा सेना यांच्या वतीने जीन मैदान येथील युवा सेना संपर्क कार्यालयात अभिवादन करण्यात आले. यावेळी शिवसेना तालुका प्रमुख सुधाकर लावंड, विधानसभा संघटक संजय शिंदे, शहरप्रमुख प्रविण कटारिया यांचे हस्ते शिवसेना प्रमुखांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी शिवसेना उपतालुका प्रमुख बंडू शिंदे, ॲड.विकास जरांडे, युवासेना उपजिल्हा प्रमुख मयुर यादव, शहरप्रमुख समीर हलवाई, तालुका समन्वयक पांडूरंग ढाणेउपस्थित होते. यावेळी युवासेना तालुकाप्रमुख शंभुराजे फरतडे, प्रविण कटारिया यांनी मनोगत व्यक्त केले.

# आवाटी येथे गौसे आजमनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न

करमाळा(सं.प्र.) : आवाटी येथे गौसे आजमनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम मोठ्या भक्तीमय व शांततेच्या वातावरणात संपन्न झाले. यावेळी राज्यभरातील लाखो भक्तगणांनी उपस्थिती दर्शवली. ग्यारहवी शरीफ निमित्त बगदाद शरीफ येथील गौसेपाक यांच्या स्मृती प्रित्यर्थ दरवर्षी आवाटी येथील दर्गाह मध्ये गौसे आजमचा धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात येतो. यामध्ये यावर्षी लाखो भाविकांनी गौसे आजमच्या गिलाफे मुबारक चादरीचा तसेच मुये मुबारकचे दर्शन घेतले. शिवाय हजारो भक्तगणांनी मुरीद होण्याच्या कार्यक्रमात सहभाग दर्शविला. आलेल्या भक्तगणांना लंगर खानाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच भक्तगणांनी तौषेकी नियाज या उपक्रमात सहभाग दर्शवून मोठ्या संख्येने हजेरी लावली. गौसे आजम निमित्त दर्गाह परिसरात विद्युत रंगाच्या विद्युत रोषणशई करण्यात आली होती. शिवाय आलेल्या भक्तगणांना पार्किंगची व्यवस्था तसचे राहण्याची व्यवस्था दर्गा कमिटीच्या वतीने करण्यात आली होती. याकामी करमाळा पोलीस कर्मचाऱ्यांनी देखील सहकार्य केले. गौसे आजम कार्यक्रमाच्या निमित्ताने दर्गाह मध्ये वली बाबा चे खादीम गुलाम नबी कादरी यांनी फातीहाखाणी केली. यावेळी त्यांच्या समवेत इरफान कादरी तसेच वलीबाबाचे लाडके दुलारे हसनैन कादरी हे उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमात आलेल्या तसेच दर्गाहला भेटी दिलेल्या अनेक मान्यवरांचे दर्गाह ट्रस्ट तसेच आवाटी ग्रामस्थ यांच्या वतीने पाहूण्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. सदरचा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी दर्गाह ट्रस्टच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी अहोरात्र विशेष परिश्रम घेतले. एकंदर पाहता आवाटी येथील वलीबाबा दर्गाहमध्ये गौसे आजमचा कार्यक्रम मोठ्या भक्तीमय वातावरणात तसेच लाखो भाविकांच्या उपस्थितीमध्ये शांततामय वातावरणात साजरा करण्यात आला; अशी माहिती ट्रस्टचे अध्यक्ष हाजी कादरभाई तांबोळी यांनी दिली.

# नवभारत इंग्लीश स्कुलमध्ये पंडित जवाहरलाल नेहरू जयंती साजरी



करमाळा(सं.प्र.) : भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती नवभारत इंग्लीश स्कुलमध्ये साजरी करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी पंडित नेहरू यांचे जीवनचरित्रपर आपले मत व्यक्त केले. या कार्यक्रमास स्कुलमधील सर्व शिक्षक, कर्मचारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

# नियमांचे पालन केल्यास ऊसवाहतूकीचे धोके कमी



करमाळा (सं.प्र.) : साखर कारखान्याचा गळीत हंगाम सुरू झाल्याने सर्वच मार्गावर ऊस वाहतुकीची वाहने आहेत. मात्र क्षमतेपेक्षा अधिक ऊसाची वाहतूक करणाऱ्या वाहनांचा धोका वाढला आहे. सुरक्षेच्या दृष्टीने वाहनाच्या पाठीमागे, बाजुला कोणत्याही उपाययोजना नसल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. करमाळा तालुक्यासह अन्य भागातील साखर कारखान्याला तालुक्यातून ऊस वाहतूक जोरात चालू आहे. ऊसाची वाहतूक ही ट्रॅक्टर, ट्रक आणि बौलगाडीच्या माध्यमातून केली जाते.

ऊस वाहतूक करत असताना त्या वाहनांच्या क्षमतेपेक्षा जास्त ऊस सर्रास वाहनांमध्ये भरलेला दिसतो. ट्रॅक्टरच्या पाठीमागे कधी एक तर कधी दोन ट्रॉली असतात. रात्रीची ऊस वाहतूक करत असताना समोरून येणाऱ्या गाडीला फक्त ट्रॅक्टर दिसतो. परंतू त्या ट्रॅक्टरच्या पाठीमागे असलेल्या ट्रॉलीवर कोणतेच इंडिकेटर नसल्याने अचानक फसगत होते. बऱ्याचदा वाहनांच्या एकदम जवळ आल्यावर त्या ट्रॉली दिसतात आणि मग घाईगडबडीत वाहन चालकाला अपघात रोखण्यासाठी धांदल उडते. ट्रॅक्टरच्या पाठीमागून येणाऱ्या वाहनाची सुध्दा तीच अवस्था होते. कधी कधी ट्रॅक्टर अचानक बंद पडतो. मग तो ट्रॅक्टर रात्रभर रस्त्यावर किंवा रस्त्याच्या कडेला थांबून ठेवला जातो. ट्रॅक्टर बंद असल्याने त्यावरती कोणतेच इंडिकेटर नसल्याने अंधारात ट्रॅक्टर रस्त्यावर असलेले दिसत नाही आणि त्यामुळे बरेच वाहने येऊन त्या बंद असलेल्या ट्रॅक्टरला धडकतात. यामुळे सुध्दा बरेच अपघात घडतात. ट्रॅक्टरवर लावलेले स्पीकर खूप मोठ्याने वाजवले जातात. त्यामुळे ट्रॅक्टरच्या पाठीमागे काय घडते याचा वाहनचालकाला अंदाज येत नाही. नजीकच्या काळात अपघात होऊ नयेत, यासाठी पोलीस प्रशासनाने तातडीने ऊस वाहतूक नियमांची अंमलबजावणी करण्याची मागणी रणजित शिंदे यांनी केली आहे.

**टेप रेकॉर्डर बंद करण्याच्या सूचना दिल्या**

ऊस वाहतूक करताना रस्त्यावर दगड ठेवणे, ट्रॉलीला रिप्लेक्टर बसवणे, टेपचा वापर, जास्त ट्रॉल्या जोडणे या संदर्भातल्या महत्वाच्या सूचना मकाई सहकारी साखर कारखाना व भैरवनाथ शुगर या दोन्ही कारखान्यावर मिटींग घेऊन सूचना देण्यात आल्या आहेत.


**जोतीराम गुंजवटे (पोलिसनिरीक्षक)**

# तालुका खते, बियाणे आणि किटकनाशके असो; च्या तालुका अध्यक्ष पदी महेश चिवटे



करमाळा(सं.प्र.) : तालुका खते, बियाणे आणि किटकनाशके असोसिएशनच्या तालुका अध्यक्ष महेश ॲग्रो एजन्सीचे संचालक महेश चिवटे यांची बिनविरोध निवड झाली. यावेळी करमाळा तालुक्यातील २७० खत विक्रेते बैठकीसाठी उपस्थित होत. यावेळी तालुका उपाध्यक्ष पदी करमाळा विभाग प्रशांत नेटके, जेऊर विभाग प्रताप जाधव, पारेवाडी विभाग निलेश खानवर, कोर्टी विभाग सागर हुलगे, केम-कंदर दादा कामटे, साडे विभाग हनुमंत सावंत, जिंती विभाग जाकीर मुलाणी, खजिनदार ऋषभ गादिया, सहखजिनदार कृष्णा सरडे, तर सचिवपदी रोहित दोशी, जेऊर यांची निवड करण्यात आली. कृषी निविष्ठा विक्रेत्यांना येणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी संस्था कटिबध्द राहणार असल्याचे नूतन अध्यक्ष महेश चिवटे यांनी सांगितले.


आनंदऋषि नेत्रालय व्हिजन सेंटर



रेबन गॉगल, फास्ट्रॅक, लाईफस्टाईल गॉगलचे स्टॉकिस्ट डिलर
अनेक व्हारायटीसह सर्व चष्मे मिळतील.
fastrack
• सर्व प्रकारचे कॉन्टॅक्ट लेंस, चष्मे, गॉगल्स विक्री व दुरुस्तीचे ठिकाण
कॉम्प्युटरव्दारे मोफत नेत्रतपासणी करून मिळेल.
मोतीबिंदू बिनटाक्याची शस्त्रक्रिया : २२०० रु. (औषध व लेन्स खर्चासह)
दर महिन्याचा तिसरा रविवारी वेळ : सकाळी १० ते २ पर्यंत
Ray-Ban गॉगल्स चे अधिकृत विक्रेते
श्री कमलादेवी ऑप्टीकल्स नगरपालिका शॉपींग सेंटर, दत्तपेठ, करमाळा.
प्रोप्रा : चाळक फिसरेकर मो.९४२३५३५४४२



॥ श्रीराम समर्थ ॥
श्री गजानन आयुर्वेद
मल्टीस्पेशालिटी स्पाईन ऑर्थो केअर सेंटर
डॉ.श्री.दिपक सुर्यकांत पाटील एम.डी.(आयुर्वेद), पुणे
I.S.O.9001-2018 Certified
डॉ.सौ.वैष्णवी दिपक पाटील आयुर्वेदाचार्य (मुंबई)
आयुर्वेदाचे वरदान-ऋतू बदलानूसार 'पंचकर्म' व्दारे शरीरशुध्दी
- वमन/विरेचन -
खालील आजारावर उपयुक्त...
वाढलेले वजन, आम्लपित्त, जुनी सर्दी, पिंपल्स
कफाचा त्रास, पोटाच्या तक्रारी, स्किन इन्फेक्शन
सोरियासिस, Eczema, वाढलेली उष्णता,
स्त्रीयांमधील पाळीच्या तक्रारी P.C.O.D.,
स्त्री-पुरुष वंध्यत्व, थायरॉइडचा त्रास इ.
उपलब्ध सुविधा...
• प्रकृतीपरिक्षण-नाडीपरिक्षण
• पंचकर्मव्दारे शरीरशुध्दी
• प्रतिकारशक्ती वाढविणारी रसायन चिकित्सा
• ऋतुचर्या-दिनचर्या मार्गदर्शन
• अनुभवी प्रशिक्षित केरळीयन पंचकर्म स्टाफ
पत्ता : 'श्रीस्मरण', बिल्डींग, शाहूनगर(सेकंड लेन), श्रीकमलाभवानी रोड, करमाळा.
मो.9822997409 / 9970765945
www.spineorthoayurved.com shrideepak17@gmail.com shrigajananayurved Shri Gajanan Ayurved Multispecialty Spira Ortha Care

# शेतकऱ्यांना सन्मान कधी मिळेल ?



माझ्या मैत्रिणीचा परवा मला फोन आला. इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्या. ती म्हणाली, 'अगं आमच्या सोनूचं लग्न यावर्षी करायचा विचार आहे. तू बघ एखादं स्थळ !'

मी म्हणाली.. 'हो बघते ना, पण काय अपेक्षा आहेत तुमच्या !'

ती म्हणाली.. 'मुलगा दिसायला छान असावा. चांगली नोकरी पाहिजे शक्यतो पुणे येथे आणि त्याला किमान आठ-दहा एकर बागायती जमीन असावी..!'

एका दमात तीनं अपेक्षा सांगितली. पण मला जरा खटकलं. चांगली नोकरी असल्यावर जमिनीची आणि ती सुध्दा बागायती, याची अपेक्षा का असावी. मी तसं बोलूनही दाखवलं.

ती म्हणाली.., 'अगं नोकरीचं उद्या कमी जास्त झालंतर जमीन पाहिजे की..!'

माझ्या मैत्रिणीचे वडील शेतकरी, नवरा शेतकरी, मुलाचं इंजिनिअरींग झालं; पण तोही शेतीच करतोय. मुलगी पदवीधर दिसायला तशी सामान्यच तरीही मुलगा नोकरदारच पाहिजे ही अपेक्षा !

शेतकरी कुटूंबातील असूनही मुलगी शेतकऱ्याला देण्याची अजिबात इच्छा नाही. ही केवळ माझ्या मैत्रिणीची अपेक्षा नाहीतर सध्या प्रत्येक लग्नाला आलेल्या मुलीच्या आईची अशीच अपेक्षा आहे. आणि ती तशी असणे ही चूक आहे असे मला वाटत नाही. कारण आज शेती हा बेभरवशाचा व्यवसाय बनला आहे. सततची नापिकी, कोरडा व ओला दुष्काळ, खत- बियाणे यांच्या वाढलेल्या किंमती आणि या तुलनेत शेतमालाला मिळणारा दर यामुळे वर्षानुवर्षे शेती व्यवसाय फारसा फायद्यात दिसत नाही. त्यामुळे शेतीकडे व ती करणाऱ्या शेतकऱ्यांकडे लोकांचा बघण्याचा दृष्टीकोन बदलला आहे.

साऱ्या जगाचा पोशिंदा असणारा शेतकरी सध्या अगदी लाचार झालेला पहावयास मिळतो. त्यामुळे शेतकरी कुटूंबातील मुलींना सुध्दा शेतकरी नवरा नको वाटतो. यामुळे प्रत्येक गावात लग्नाचे वय होऊ गेलेली कित्येक मुलं नोकरी नसल्याने वय झालं तरी लग्नाविना राहिलेली पहावयास मिळतात. मात्र असं असताना सुध्द नोकरी करणाऱ्या मुलाला सुध्दा स्वत:ची शेती असावी; अशी मुलीची व मुलीच्या आईची इच्छा असते. कारण नोकरी गेली तर जगण्यासाठी हक्काचे साधन म्हणून स्वत:ची शेती पाहिजे.. असा हा विरोधाभास आज समाजात पहावयास मिळतो. शेतीला आणि शेती करणाऱ्याला प्रतिष्ठा मिळत नाही; याचा विचार व्हायला हवा. शेतीच्या संदर्भात अशी परिस्थिती असताना सुध्दा काही मात्र आपले वडिलोपार्जित शेती मोठ्या नेटाने व कष्ट करत असल्याचे पहावयास मिळते. आधुनिकतेचा ध्यास घेऊन आपल्या शेतीमध्ये आधुनिक तंत्राचा वापर करत यातूनच उत्पादन वाढ साधून आहेत. बाजारपेठेचा अभ्यास करून वेगवेगळ्या पिकांमध्ये नवीन प्रयोग करत लाखोंचे उत्पन्न घेणारे शेतकरीही आहेत.

आज शेतकऱ्यांची शिकलेली मुलं शेती करण्यासाठी पुढे येत असताना त्यांना शेतीसाठी पुरेसे पाणी, वीज व शेतीमालाला शाश्वत दर मिळणे गरजेचे आहे. ते जर मिळालेतर शेती व्यवसाय सुध्दा इतर कोणत्याही व्यवसायाच्या मागे राहणार नाही. शेतकऱ्यांच्या घामाचा योग्य दाम झाला तरच शेती आणि शेतकऱ्यांना सन्मान मिळेल..!

हर्षाली प्रशांत नाईकनवरे, शेटफळ



# अपंग शेतकरी ज्ञानदेव देवकर यांचा आत्मदहनाचा इशारा

करमाळा(सं.प्र.) : पाटबंधारे विभागाने विना मोबदला संपादित केलेली जमीन परंतू पाण्यात न जाणारी जमीन कसण्यास कायमस्वरूपी मिळावी; अशी मागणी केम येथील अपंग शेतकरी ज्ञानदेव रामचंद्र देवकर यांनी निवेदनाव्दारे जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे. सदर जमीन कसण्यास कायमस्वरूपी न दिल्यास ५ डिसेंबरला लोकशाही दिनी जिल्हाधिकारी कार्यालय समोर आत्मदहन करणार आहे; असाही इशारा दिला आहे.

निवेदनात देवकर यांनी म्हटले आहे, की केम येथील मी रहिवासी असून माझ्या नावावर केम येथे गट नं.५५८/१, ५५८/२ व ५६० या जमिनी होत्या. सदरच्या जमिनीतील पाझर तलावात (पळसाचे) शेत) या जमिनी विनामोबदला संपादित झालेली आहे. सदर जमिनीशिवाय मला दुसरी कोणतीही जमीन नाही. त्यामुळे मी भुमीहीन झालेलो आहे. तसचे मी स्वत: अपंग असून मला वॉकरच्या साह्याशिवय चालता येत नाही शिवाय सोबत एक माणूस असल्याशिवाय प्रवास करता येत नाही. माझी संपादित जमीन ही पाटबंधारे विभागाने कोणताही मोबदला न देऊन जमीन संपादीत केलेली आहे. सदरची मिळकत वहिवाटण्यासाठी लगतचे शेतकरी मी अपंग असल्याने मला त्रास देत आहेत व हरकत करत आहेत. त्यामुळे सदरची जमीन संपादीत झाली असलीतरी प्रत्यक्षात या तलावात पाण्याखाली जात नाही त्यामुळे सदरची जमीन वर्षानुवर्षे पडिक आहे. ती जमीन माझ्या नावावर करण्यात यावी; असेही देवकर यांनी म्हटले आहे.

## आळजापूर शाळेचा आदर्श उपक्रम

# ७०४०० रू.च्या सायकलीची उभा केली बँक



करमाळा(सं.प्र.) : आळजापूर येथील जिल्हापरिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक लहू चव्हाण व त्यांचे सहकाऱ्यांनी अतिशय चांगला उपक्रम राबविला असून, लोकवर्गणीतून ७०४०० रू. किंमतीच्या १६ सायकली घेऊन सायकल बँक उभारली आहे. या सायकलीचे वितरण नुकतेच गटविकास अधिकारी मनोज राऊत, गटशिक्षणाधिकारी राजकुमार पाटील, विस्तार अधिकारी जयवंत नलवडे व धर्मवीर प्रतिष्ठानचे संस्थापक संजय घोलप यांचे हस्ते वितरीत करण्यात आले.

आळजापूर येथील शिक्षणप्रेमी पालक व ग्रामस्थ यांचे वतीने वस्तीवरून पायी चालत येणाऱ्या पाचवी ते सातवी शिकणाऱ्या मुलींसाठी १६ सायकली खरेदी करण्यात आलेल्या आहेत. यासाठी अशोक फाऊंडेशनचे राजेंद्र रोडे, डॉ.गौतम रोडे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुरेश गपाट, उपाध्यक्ष दत्तात्रय टेंबाळे, सदस्य रघुनाथ रोडे, युवराज गपाट, दादासाहेब रोडे, दादासाहेब नवले, स्वत: मुख्याध्यापक लहू चव्हाण, चेतन किंगर, माजी जि.प.सदस्या राणी वारे, अभिमन्यु काळे यांनी या सायकलीसाठी देणगी दिली.सायकल प्रदान करताना आळजापूरच्या सरपंच मनिषा घोडके, प्रतिनिधी रविकांत घोडके, दत्तात्रय घोडके, ग्रा.पं.सदस्या पार्वती रोडे, कैलास रोडे, महादेव गायकवाड, विनोद नवले, विलास गायकवाड, लक्ष्मण वाघमोडे, दादासाहेब रोडे, विश्वंभर रोडे, बाळू गायकवाड, पापासाहेब काळे, दस्तगीर शेख, भरत रोडे यांचेसह शिक्षणप्रेमी पालक उपस्थित होते. सुत्रसंचालन सहशिक्षिका सानप मॅडम यांनी केले. उपस्थितांचे स्वागत विद्या निगुडे यांनी केले. प्रास्ताविक गुंजाळ मॅडम यांनी केले. आभार मुख्याध्यापक लहू चव्हाण मानले.

# रिटेवाडी रस्त्याचे कामासाठी ग्रामस्थांचे उपोषण



करमाळा(सं.प्र.) : रिटेवाडी येथील पुनर्वसन विभागाकडून सुरू असलेल्या पोहोच रस्त्याचे काम वर्षभरापासून बंद आहे. या रस्त्याच्या कामासाठी रिटेवाडी ग्रामस्थांनी दीड किलोमीटर अंतराचा रस्ता होण्यासाठी खूप मोठा संघर्ष केला आहे. उजनी पुनर्वसन झाल्यापासून ४५ वर्षापासून मोठ्या प्रयत्नाने या रस्त्याचे काम सुरू झाले होते. मात्र वर्षभरापासून हे काम अर्धवट अवस्थेत ठेकेदाराने बंद ठेवले आहे. वारंवार मागणी करूनही ठेकेदार व संबंधित विभागाचे अधिकारी हे काम सुरू करत नाहीत. यासाठी तहसील कार्यालय करमाळा येथे रिटेवाडीचे सरपंच दादासाहेब कोकरे, संभाजी रिटे, अंगद गोडगे, कल्याण कोकरे, नवनाथ रिटे, राजेंद्र मुटके, मगनदास कोकरे, संताजी पवार, नितीन कोकरे, दादा ढवळे, रेवणनाथ कोकरे, बबलु कोकरे, अमोल कोकरे आदी ग्रामस्थ बेमुदत उपोषणाला बसले आहेत.

रिटेवाडी रस्त्याचे काम अर्धवट अवस्थेत झाल्याने येथील ग्रामस्थांना वाहतुकीसाठी त्रास सहन करावा लागत आहे. संबंधित पुनर्वसन विभागाचे अधिकारी व ठेकेदार यांच्याकडे काम सुरू करण्याबाबत वारंवार मागणी केली. मात्र याकडे त्यांनी दुर्लक्ष केले आहे. याबाबत आमदार संजय शिंदे, तहसीलदार समीर माने यांना प्रत्यक्ष भेटून काम सुरू करण्याबाबत विनंती केली आहे. मात्र आमच्या मागणीकडे दुर्लक्ष केल्याने आम्ही अर्धवट अवस्थेतील रस्त्याचे काम सुरू करण्यासाठी उपोषणाला बसलो आहोत.

...दादासाहेब कोकरे (सरपंच, रिटेवाडी)

सा.संदेश वार्षिक वर्गणी १५० रू. भरून घरपोच वर्षेभर अंक मिळवा..!

# ॲडव्होकेट व्हाया कंपाऊंडर

"लहरोसे डरकर नौका पार नही होती । कोशिश करनेवालोंकी कभी हार नही होती ॥.... असफलता एक चुनौती है स्विकार करो, क्या कमी रह गयी देखो और सुधार करो । जब तक न सफल हो, निंद चैन की त्यागो तुम, संघर्षों का मैदान छोड मत भागो तुम । कुछ किए बिना ही जयजयकार नही होती, कोशिश करनेवालोंकी कभी हार नही होती ।" हरिवंशराय बच्चन यांच्या या ओळी आठवण्याचे कारण म्हणजे आमच्या कार्यालयात एक कामगार म्हणून आकाश मंगवडे यांनी प्रवेश केला आणि आज त्यांनी जिद्द, चिकाटी व प्रयत्नाच्या जोरावर चक्क ॲडव्होकेट आकाश मंगवडे म्हणून कार्यरत झाले आहेत. १५ नोव्हेंबर २०२२ ला आकाश मंगवडे यांना महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिलची सनद प्राप्त झाली आहे.

आकाश मंगवडे यांचे मुळगाव अंजनडोह असलेतरी त्यांचे वडील करमाळा येथे खाजगी व्यावसायिकाकडे कामाला होते. त्यामुळे त्यांचे बालपण व शिक्षण करमाळ्यात झाले. पहिली ते चौथी मुलांची शाळा नं.२, पाचवी ते दहावी महात्मा गांधी हायस्कुल, अकरावी ते बारावी यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात (वाणिज्य) तर पदवीचे शिक्षण दादा पाटील महाविद्यालय कर्जत (वाणिज्य) पूर्ण झाले. त्यानंतरचे एलएल.बी. चे शिक्षण पुणे येथील यशवंतराव चव्हाण विधी महाविद्यालयात पूर्ण झाले आहे.

श्री.मंगवडे यांचे वडील युवराज मंगवडे यांचे सन २०१२ मध्ये निधन झाले. तत्पूर्वी सन २००८ पासून ते आजारी असल्याने त्यांच्या दवाखान्याचा खर्च आणि घर चालविण्याचा खर्च याची सर्व जबाबदारी आई श्रीमती आशाबाई मंगवडे यांचेवर पडली होती. आपल्या आईवर पडलेली जबाबदारी ही लहान असतानाच आकाश यांनी ओळखली व हायस्कुलला असतानाच त्यांनी सुरूवातीला सन २००९ ते २०११ या कालावधीत डॉ.अविनाश घोलप यांच्या घोलप हॉस्पिटलमध्ये कंपाऊंडर म्हणून काम केले. त्यानंतर २०११-१२ मध्ये संदिप पवार यांचेकडे भुसापेंडीच्या दुकानात काम केले. त्यानंतर सन २०१३ पासून सा.कमलाभवानी संदेश पर्यायाने माझ्यासोबत काम सुरू केले. दरम्यान आईने २००९ ते २०१५ पर्यंत घरी मेस चालवली. त्याचे डबे पोहोच करण्याचे काम आकाश यांनी केले.

दरम्यानच्या कालावधीत खाजगी काम, कर्जत महाविद्यालयात जाणे-येणे आणि घराची जबाबदारी हे सर्व लहान वयातही आकाश यांनी अतिशय समर्थपणे पार पाडली. विशेष म्हणजे लहानपणापासून त्यांनी चांगल्या मित्रांचे वलय मिळवल्याने या प्रवासात त्यांना कधीही अडचण आली नाही. विशेष म्हणजे काम हे कमी प्रतीचे आहे असे कधीही न मानता जे हाती येईल ते काम करत राहणे; हा एक आकाशचा वेगळा गुण आहे. संदेश कार्यालयात आल्यापासून संगणक चालविणे, बातम्या करणे, मुलाखती घेणे याबरोबरच कोर्टातील अर्जापासून दावे तयार करण्याची कामे आकाश यांनी केली आहेत. एवढेच नाहीतर वकीलाचे क्लार्क म्हणूनही त्यांनी करमाळा न्यायालयात गेल्या सहा वर्षापासून काम केले आहे. वकीलाचा क्लार्क म्हणून काम करतानाच आपणाला वकील व्हायचे आहे हे स्वप्न मनाशी बाळगून त्यादृष्टीने न्यायालयात जास्तीत जास्त वेळ देऊन सर्व बाबीचा अभ्यास करत ज्या न्यायालयात वकीलाचे क्लार्क म्हणून काम केले त्याच न्यायालयात वकील म्हणून काम करण्याची संधी श्री.मंगवडे यांनी मिळवली आहे. यातूनच त्यांनी वकीलापासून न्यायदान क्षेत्राकडे जाण्याचे स्वप्न पाहावे; ही अपेक्षा !

> आकाश मंगवडे यांचेकडे चौकसवृत्ती असून प्रत्येक बाबीचे ते माहिती घेतात. तसेच पक्षकाराशी कसा संपर्क ठेवावा, त्यांची कामे कशी करावी; एवढेच नाहीतर त्यांच्या व्यक्तीगत प्रश्न सोडविण्यास त्यांचा पुढाकार असतो. पक्षकारांशी मोजक्या पण गोड शब्दात बोलणे, त्यांच्या सूचनेनुसार झटपट कामे करणे आणि न्यायालयातील कर्मचाऱ्यापासून न्यायाधीशा पर्यंत वकीलांची कामे कशी केली जातात याची त्यांना पुरेपूर माहिती आहे. वकीली क्षेत्रात पैसे मिळवण्यापेक्षा आलेल्या कामा-साठी वेळ देणे, जे काम आहे ते काम कोणत्या कायद्यातून होवू शकेल हे पाहणे, त्यासाठी उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयाचे दाखले पाहणे आणि तेवढ्याच ताकदीने न्यायाधीशा समोर बाजू मांडणे याबाबी असल्या की वकील हा यशस्वी होतो. या सर्व बाबी श्री.मंगवडे यांनी वकील होण्यापूर्वीच आत्मसात केल्यामुळे त्यांचा भविष्यकाळ उज्वल आहे.



# विवाहनंतर शिक्षण-एकाचवेळी तीन ठिकाणी ऑर्डर

करमाळा (सुप्रिया माने याजकडून) : लहानपणी मुलीचं लग्न की मुली चुल आणि मुल यातच गुंतून जातात. या मुलींचे भविष्य म्हणजे पतीचा संसार, पती सांगेल ते काम, मुलांची काळजी आणि त्यांच्यासाठीच आयुष्याची झीज करायची. पण एखादी विवाहिता जिद्दी असेल आणि पतीची तिला साथ मिळत असेलतर ती महिला आपलं आयुष्य उज्वल केल्याशिवाय राहत नाही. अगर बुलंद इरादा और हौसला हो, तो हर इन्सान अपने सपने पूरे कर सकता है । अगदी असंच घडलं आहे ते म्हणजे येथील भुमीअभिलेख कार्यालयातील निमतानादार सौ.वर्षाराणी मोटे यांचे.





वर्षाराणी वैजिनाथ मोटे यांचा जन्म १९८२ चा असून त्यांचे लग्न येथील महात्मा गांधी विद्यालयातील शिक्षक व पाथुर्डी सहकारी संस्थेचे चेअरमन वैजिनाथ मोटे यांचेबरोबर २१ नोव्हेंबर २००० रोजी झाले. त्यांच्या लग्नानंतर त्यांना मिळालेली पतीची साथ, सासु-सासऱ्यांचे पाठबळ आणि आई-वडीलांची प्रेरणा यातूनच त्यांनी आपल्या जीवनाला पूर्ण कलाटणी दिली आहे.

त्यांचे आई-वडील दिनकर सातपुते व पद्मिनी सातपुते हे हिसरे येथील रहिवाशी असून प्राथमिक शिक्षण तेथेच झाले. त्यानंतर बार्शी येथे श्रीमान भाऊसाहेब झाडबुके विद्यालयात पाचवी ते बारावी पर्यंत शिक्षण झाले. दरम्यान वडील पुढे व्यवसायाच्या निमित्ताने खालापूर, जि.रायगड येथे गेले. तर बारावीनंतर त्यांचे लग्न झाले आणि त्या करमाळ्यात आल्या. करमाळ्यात आल्यानंतर पुढील शिक्षण यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात बी.ए. पर्यंत झाले. त्यानंतर पतीच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी एमपीएससी (अर्हता परीक्षा मुंबई विभाग कोकण) चा अभ्यास सुरू केला. तसेच संगणकाचेही प्रशिक्षण घेतले. या अभ्यासातूनच त्यांना एकाचवेळी महाराष्ट्र शासनाच्या तीन विभागातून ऑर्डर आल्या होत्या. त्यामध्ये निबंधक कार्यालय, भुमिअभिलेख कार्यालय व जिल्हाधिकारी कार्यालय परंतू त्यांनी भुमिअभिलेख कार्यालयातील नोकरी पसंद केली. लग्नानंतर सहा वर्षांनी त्यांना नोकरी मिळाली. शिक्षण चालू असतानाच एसवायबीए ला असताना मुलगी समीक्षा हिचा जन्म झाला असून, ती सध्या रशियामध्ये वैद्यकिय शिक्षण घेत आहे. तर नोकरीला लागल्यानंतर मुलगा आश्लेष याचा जन्म झाला आहे.

> माझे पती वैजिनाथ मोटे सर यांच्या पाठबळामुळे मला शिक्षण घेता आले. ट्रेनिंग घेता आले, एमपीएससी करता आली व अनेकांना नोकरीची समस्या असताना मला मात्र एकाचवेळी तीन-तीन ऑर्डर मिळाल्या हे विशेष आहे. नोकरीच्या निमित्ताने मला बाहेरही जावे लागले. जेव्हा खालापूरहून करमाळ्याला बदली झाली तो माझा विशेष आनंदाचा क्षण आहे. तर कोरोनात वनविभागात कार्यरत असणारे बंधू कमलाकर सातपुते यांचे निधन हा माझ्या जीवनातील दु:खाचा क्षण आहे. माझी मुलगी परदेशात शिकत असून मुलगा महात्मा गांधी विद्यालयात आठवीला आहे. भुमिअभिलेख कार्यालयात काम करताना अनेक अडचणी येत असल्यातरी शेतकऱ्यांच्या समस्या समजावून घेऊन त्यांना जास्तीत जास्त मदत करण्याच्या दृष्टीने मी प्रयत्नशील असते.
>
> **...सौ.वर्षाराणी वैजिनाथ मोटे (7666700598)**
> (निमतानादार, भुमिअभिलेख कार्यालय )

नोकरीच्या कालावधीत साडेसोळा वर्षामध्ये त्यांना भुमिअभिलेख दिनाच्यानिमित्ताने दोन वेळा गुणवंत कर्मचारी हा पुरस्कार मिळाला आहे. या सर्व वाटचालीत सासरे कै.आजिनाथ मोटे तसेच सासू सौ.इंदूबाई मोटे यांचे त्यांना मोठे पाठबळ मिळाले आहे.

***



# तृतीय स्मृतीदिन

माणसं, आप्त, सगे-सोबती सगळे भेटतात..,
'आई' भेटत नाही अन् तिचा शोधही संपत नाही

सेवानिवृत्त मुख्याध्यापिका

**सौ.रामकुंवर मुरलीधर अब्दुले**

यांच्या दि.२२/११/२०२२ रोजी असलेल्या
तृतीय स्मृतीदिनानिमित्त त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन !

अभिवादक

**अब्दुले व कांबळे परिवार, करमाळा.**





महाराष्ट्र राज्य सहकारी साखर संघाच्या संचालक पदी
बागल गटाच्या स्वाभिमानी नेत्या

**सौ.रश्मी(दिदी) बागल-कोलते**

यांची निवड झाल्याबद्दल..

**हार्दिक अभिनंदन !**



श्री.अमोल खाटमोडे-पाटील

शुभेच्छुक

- शामलताई बागल महिला दूध संस्था
- किर्तेश्वर कृषी उद्योग समूह
- शिव-प्रताप प्रतिष्ठान सेवाभावी संस्था
- विराज अर्थमुव्हर्स

केत्तूर नं.२, ता.करमाळा, जि.सोलापूर